# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
छत्रपती संभाजीनगर ४३१००५
(स्वायत्त) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)

Telephone : 0240-2334025 Email.rbtecsn@msbte.ac.in Web : www.msbte.ac.in


जा. क्र. मरातंशमं/विका-छसंनगर/नोंदणी-हि.प./२०२६/ 838 दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६

**परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत

सर्व AICTE मान्यताप्राप्त संस्था - पदविका.

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नवीन प्रवेशित प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) व हिवाळी-२०२६ परीक्षा अर्ज भरणेबाबत.**

**संदर्भ:** मंडळाचे परिपत्रक जा. क्र. मरातंशमं/का-४० (परीक्षा विभाग)/F१०/२०२६/३०३, दि. १४/०८/२०२६

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये AICTE मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नोंदणीकरिता **(Enrollment) Institute Login** मध्ये लिंक उपलब्ध करून देण्यात आली असून, नोंदणी व हिवाळी-२०२६ परीक्षा अर्ज भरणेबाबतचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. सदर वेळापत्रकाची विहित मुदतीत व अचूक अंमलबजावणी होणेकरिता आपणास खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**अ) मंडळाने निश्चित केलेले वेळापत्रक: सर्व AICTE मान्यताप्राप्त संस्था यांनी तंतोतंत पालन करणे:**

| अ. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | संस्थास्तरावर नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून नियमित परीक्षा शुल्कासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | २१ ते ३१ ऑगस्ट, २०२६ |
| २ | नियमित परीक्षा शुल्क + रु. २००/- दंडासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | ०१ ते ०४ सप्टेंबर, २०२६ |
| ३ | नियमित परीक्षा शुल्क + रु. १,५००/- दंडासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | ०५ ते ०७ सप्टेंबर, २०२६ |

**ब) संस्थांसाठी विभागीय कार्यालयाकडून सूचना व वेळापत्रक:**

१) प्रथम वर्ष नोंदणी **(Enrollment)** व थेट द्वितीय वर्षात **(DSY)** प्रवेशित विद्यार्थ्यांची **Admission Level Eligibility or COE** माहिती ऑनलाईन भरून विभागीय कार्यालयाकडून खालीलप्रमाणे दिलेल्या वेळापत्रकानुसार आपली माहिती निश्चित (Confirm) करून घ्यावी. तसेच विभागीय कार्यालयाकडून थेट द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची **Admission Level Eligibility or COE** माहिती निश्चित (Confirm) झाल्यानंतरच थेट द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया करता येईल, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, लातूर, नांदेड | २५ ऑगस्ट, २०२६ |
| २ | नाशिक, धाराशिव, बीड, परभणी, जालना | २६ ऑगस्ट, २०२६ |
| ३ | अहिल्यानगर, नंदुरबार, जळगाव, धुळे | २७ ऑगस्ट, २०२६ |

२) इयत्ता बारावी (HSC) सायन्स उत्तीर्ण होऊन प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षातील विषयांमध्ये सूट (Exemption) द्यावयाची आहे, अशा विद्यार्थ्यांची इयत्ता बारावी (HSC) सायन्सची गुणपत्रिका पडताळणी करून **Online Exemption Subject Link** मध्ये माहिती भरावी व सदर अर्ज विभागीय कार्यालयाकडे **दि. २६ ऑगस्ट, २०२६ ते २९ ऑगस्ट पर्यंत** सादर करावेत. विभागीय कार्यालयाकडून अर्ज निश्चित झाल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२६ परीक्षा अर्ज निश्चित करावेत. सदर अर्ज संस्थेच्या लेटर हेड सोबत निश्चित केलेली माहिती **E-mail** द्वारे करावी.

३) थेट द्वितीय वर्षात **(DSY)** प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी **(Enrollment)** विभागीय कार्यालयाकडून खालीलप्रमाणे दिलेल्या वेळापत्रकानुसार निश्चिती करून घेणे.

| अ. क्र. | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, लातूर, नांदेड, धाराशिव, बीड, परभणी, जालना | ०२ सप्टेंबर, २०२६ |
| २ | नाशिक, अहिल्यानगर, नंदुरबार, जळगाव, धुळे | ०३ सप्टेंबर, २०२६ |

४) परीक्षा अर्जाच्या विभागीय कार्यालयाकडून खालीलप्रमाणे दिलेल्या वेळापत्रकानुसार निश्चिती करून घेणे.

| अ. क्र. | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, लातूर, नांदेड, धाराशिव, बीड, परभणी, जालना | ०७ सप्टेंबर, २०२६ |
| २ | नाशिक, अहिल्यानगर, नंदुरबार, जळगाव, धुळे | ०८ सप्टेंबर, २०२६ |

५) संस्थानिहाय नोंदणी व परीक्षा अर्जाच्या विहित मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहील.

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी वर नमूद कालावधीमध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी करून त्यांचे हिवाळी परीक्षा-२०२६ करिताचे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयात निश्चित करावेत. विभागीय कार्यालयामार्फत निश्चित झालेले परीक्षा अर्जच हिवाळी परीक्षा-२०२६ करिता ग्राह्य धरण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

D. Dandgavhal 17.8.26

(देवेंद्र र. दंडगव्हाळ)
उपसचिव
म. रा. तं. शिक्षण मंडळ, प्रा. का. छत्रपती संभाजीनगर

**प्रत:** १) मा. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.